# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


(2015-डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष)

क्रमांक : २अ/एडीएम/२०१५/ ८८७

दिनांक : -9 JUL 2015

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / नागपूर / अमरावती

विषय : थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या उपलब्ध जागा कळविण्याबाबत...

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून करण्यात येणार आहेत. याकरिता विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करणे,विकल्प अर्ज सादर करणे, प्रवेशाचे ॲलॉटमेंट आणि प्रवेश निश्चिती या प्रक्रिया Online Application System नुसार संचालनालयाकडून करण्यात येणार आहे. थेट द्वितीय वर्षासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून उपलब्ध करावयाच्या जागांची गणना कशी करावी याची सविस्तर माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीपुस्तकात नमूद केली आहे. संस्थेसाठी युजर मॅन्युअल On line System मध्ये उपलब्ध करून दिलेले आहेत.

**अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या संस्थांमधील अल्पसंख्यांक कोटयातील जागांसंदर्भात संचालनालयाने प्रसिध्द केलेली अधिसूचना क्रमांक २अ/एडीएम/२०१५/७७५, दिनांक ५.६.२०१५ पहावी.**महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेला दिनांक १२.५.२०१५ रोजीच्या अध्यादेशानुसार अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असलेल्या संस्थांनी त्यांचे प्रवेश त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्यांक प्रवर्गामधूनच करणे अनिवार्य आहे. अन्य अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश अल्पसंख्यांक कोटयात करता येणार नाहीत ही बाब प्रकर्षाने विचारात घेण्याबाबत कळविण्यात यावे.

रिक्त जागा कळविण्यासाठी संस्थेने त्यांच्या संस्थेचा कोड क्रमांक व संचालनालयाकडून देण्यात आलेला पासवर्ड चा उपयोग करून ऑनलाईन पध्दतीने रिक्त जागा भरणे आवश्यक आहेत. संस्थेतील अंतर्गत अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थ्यांच्या बदल्या करून रिक्त असलेल्या जागा ऑनलाईन पध्दतीने भरून झाल्यानंतर ऑनलाईन रिपोर्ट उपलब्ध होईल तो रिपोर्ट संबंधित विभागीय कार्यालयांकडे जाऊन संस्थेने कन्फर्म करणे जरुरीचे आहे. याबाबत काही अडचणी उद्भवल्यास विभागीय कार्यालये किंवा संचालनालयास मेसेजबॉक्सद्वारे कळविण्याची सुविधा उपलब्ध आहे. विनाअनुदानीत बिगर अल्पसंख्यांक संस्थांनी त्यांच्याकडील रिक्त जागांच्या संख्या कळविणे आवश्यक आहे. अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांनी त्यांच्याकडील रिक्त जागांपैकी अल्पसंख्यांक कोटयासाठी किती जागा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी किती जागा उपलब्ध करून दयावयाच्या आहेत ती संख्या अपलोड करणे आवश्यक आहे. अल्पसंख्यांक कोटयात राखीव असलेल्या जागांवर प्रत्यक्ष प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची माहिती अपलोड करून तदनंतर उपलब्ध असलेल्या अल्पसंख्यांक कोटयातील रिक्त जागाही कळवावयाच्या आहेत.

ज्या अल्पसंख्यांक संस्थांनी अल्पसंख्यांक कोटयातील जागा समर्पित केल्या असतील अशा अभ्यासक्रमांतील अल्पसंख्यांक कोटयातील विद्यार्थ्याने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेतल्यास त्याचा अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेश रद्द होईल. सदरहू रिक्त जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पुढील फेरीसाठी उपलब्ध होईल.

अल्पसंख्याक कोटयातील ज्या जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी समर्पित करण्यात येतील त्या जागा पहिल्या केंद्रीभूत प्रवेश फेरीत त्या त्या अल्पसंख्यांक प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येतील. पहिल्या केंद्रीभूत प्रवेश फेरीनंतरही या जागा रिक्त राहिल्या तर दुस-या प्रवेश फेरीच्या वेळी प्रथम त्या त्या अल्पसंख्यांक प्रवर्गातील उमेदवारांमधून त्या जागा भरण्यात येतील व तदनंतरही त्या जागा भरल्या गेल्या नाहीत तर गुणवत्तेनुसार महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांना त्या जागांवर प्रवेश ॲलॉट करण्यात येईल.

संस्थांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या सर्व जागांची माहिती ऑनलाईन पध्दतीने बिनचुकपणे भरणे आवश्यक आहे. एकदा भरलेली माहिती बदलवता येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी. संस्थांनी उपलब्ध जागांची माहिती भरून ती कन्फर्म झाल्यावर संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध जागांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी आणि अल्पसंख्यांक कोटयातील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध केलेल्या जागांची माहिती प्रसिध्द करण्यात येईल. ती माहिती प्रत्येक संस्थेने पडताळणी करून दर्शविलेल्या जागा योग्य असल्याचे प्रमाणपत्र संस्थाप्रमुखांच्या सही शिक्क्यानिशी संबंधित विभागीय कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

विभागीय कार्यालयांनी संस्थाबदल किंवा अभ्यासक्रम बदल केलेल्या / तदनंतर रुजू झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती विचारात घेऊन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध रिक्त जागांची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. संचालनालयाकडून संस्थाबदलास मान्यता दिल्याच्या प्रकरणी संबंधित संस्थांच्या रिक्त जागांमध्ये बदल संचालनालय स्तरावरून दर्शविण्यात येईल. याबाबतचा अहवाल संस्थांना लॉग इन द्वारे उपलब्ध आहे.

संचालनालयाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध जागांची माहिती योग्य असल्याची खात्री प्रत्येक संस्थेने घेणे आवश्यक असून या माहितीमध्ये तफावत आढळल्यास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील शासनमान्य थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीनुसार कारवाई करण्यात येईल व त्यास संबंधित संस्था जबाबदार असेल याची नोंद घेण्यास सर्व संस्थांना कळविण्यात यावे.

रिक्त जागा कळविण्यासाठी वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचा प्रकार | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | Online पध्दतीने केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेसाठी उपलब्ध रिक्त जागांची माहिती भरून निश्चित करणे | २०.७.२०१५ |
| २ | Online पध्दतीने संस्थांकडून उपलब्ध रिक्त जागांची पडताळणी करून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध असलेल्या जागांची विभागीय कार्यालयाकडून निश्चिती करणे | २४.७.२०१५ |

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. सर्व शासकीय /शासकीय अनुदानीत/ विद्यापीठ नियंत्रित / विद्यापीठ व्यवस्थापित / विनाअनुदानीत अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था)
२. कार्यासन क्रमांक २, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, संचालनालय स्तरावरून विद्यार्थ्यांच्या संस्थाबदल करण्यात येणा-या प्रकरणी रिक्त जागांची स्थिती बदलण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी
३. माहिती व तंत्रज्ञान कक्ष, कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
पत्र क्र. तंशिसं/विकाना/प्रवेश प्रक्रिया/२०१५/ 2082
दिनांक : 10 JUL 2015

प्रत : प्राचार्य, सर्व शासकीय/शासकीय अनुदानित/विद्यापीठ व्यवस्थापित/विना अनुदानित अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम संस्था, नागपूर विभाग, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

त्यांना कळविण्यांत येते की, संचालनालयाचे **दिनांक ०९ जुलै २०१५** चे पत्रातील दिलेल्या वेळेपत्रकानुसार संचालनालयाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध रिक्त जागांची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध जागांची माहिती योग्य असल्याची खात्री पत्रातील दिलेल्या वेळेपत्रकानुसार त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी.

**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर